# भारताने इंग्लंडपुढे ठेवले ३७१ धावांचे लक्ष्य !

- ऋषभ पंतचे ऐतिहासिक द्विशतक
- दोन्ही डावात शतके करणारा भारताचा पहिला आणि जगातील दुसरा यष्टीरक्षक

**हॅडिंग्ले, दि. २३ :**

भारताने इंग्लंडविरुद्ध पहिल्या कसोटी सामन्याच्या चौथ्या दिवशी भक्कम फलंदाजी करत इंग्लंडसमोर ३७१ धावांचे लक्ष ठेवले. ऋषभ पंतच्या दोन्ही डावांतील शतकांनी भारताच्या डावाला बळकटी दिली. पंतने पहिल्या डावात १३४ आणि दुसऱ्या डावात ११८ धावांची शानदार खेळी करत ऐतिहासिक कामगिरी केली.

हे करताना पंत कसोटी क्रिकेटमध्ये दोन्ही डावात शतके करणारा भारताचा पहिला आणि जगातील दुसरा यष्टीरक्षक बनला आहे. याआधी २००१ मध्ये झिम्बाब्वेचा अँडी फ्लॉवरने अशी कामगिरी केली होती. दुसऱ्या डावात पंतने १३ चौकार आणि दोन षटकार ठोकले. त्याच्या आक्रमक फलंदाजीमुळे भारत मजबूत स्थितीत पोहोचला.



भारताचा डाव ९२/३ या संकटात असताना पंतने के. एल. राहुलसोबत १९५ धावांची निर्णायक भागीदारी रचली. राहुलने संयमी खेळी करत २०२ चेंडूंमध्ये आपले नववे कसोटी शतक साकारले आणि चहापानावेळी १२० धावांवर नाबाद होता. भारताची धावसंख्या त्या वेळी ४ बाद २९८ होती आणि आघाडी ३०४ धावांवर पोहोचली होती.

इंग्लंडकडून शोएब बशीर आणि जोश टँग यांनी अखेरच्या सत्रात काही यश मिळवले. शोएब बशीरने प्रसिद्ध कृष्णाला बाद करत भारताचा डाव ३६४ धावांवर संपवला. कृष्णाने मोठा फटका खेळण्याचा प्रयत्न केला, पण डीप मिडविकेटवर जोश टँगने अचूक झेल घेतला.

भारताच्या डावात रवींद्र जडेजानेही महत्त्वाचा वाटा उचलताना काही आक्रमक फटकेबाजी केली. त्याच्या एक फटक्यावर स्क्वेअर लेगला मारलेला सपाट षटकार विशेष उल्लेखनीय ठरला. ९२व्या षटकात जडेजाने एक धाव घेत स्ट्राइक प्रसिद्धकडे सोपवला आणि भारताची धावसंख्या ३५० पार गेली.

टँगने एकाच षटकात मोहम्मद सिराज, जसप्रीत बुमराह आणि प्रसिद्ध कृष्णा यांच्या विकेट घेत तीन बळी मिळवले. त्यातल्या दोन चेंडूंवर त्याला हॅट्रिकची संधी होती. सिराजने पहिल्याच चेंडूवर विकेट गमावली, तर बुमराहने दोन चेंडू टिकून शेवटी क्लीन बोल्ड झाला.

दरम्यान, भारताने ३५० धावांची आघाडी गाठत सामना निर्णायक टप्प्यावर आणला आहे. इंग्लंडच्या गोलंदाजांना जोफ्रा आर्चर आणि मार्क वूडच्या अनुपस्थितीत जुन्या चेंडूवर प्रभाव पाडता आला नाही. भारताच्या गोलंदाजीची धुरा पुन्हा एकदा जसप्रीत बुमराहकडे असणार आहे.

२०२२ मधील एजबॅस्टन कसोटीत इंग्लंडने मोठा पाठलाग करत विजय मिळवला होता. त्यामुळे भारत या सामन्यात विजयाच्या जवळ असूनही इंग्लंडच्या शक्य पुनरागमनाबाबत सावध आहे.

### चौथ्या दिवसाची ठळक वैशिष्ट्ये

- ऋषभ पंत कसोटीतील दोन्ही डावात शतके करणारा पहिला भारतीय यष्टीरक्षक
- भारताची दुसऱ्या डावातील आघाडी: ३७१ धावा
- के. एल. राहुलचे संयमी शतक
- जोश टँगचा उत्कृष्ट स्पेल: एकाच षटकात तीन बळी
- इंग्लंडसमोर पाचव्या दिवशी कठीण लक्ष्य

# श्रीलंकेविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेसाठी बांगलादेशचा संघ जाहीर

**ढाका, दि. २३ :**

श्रीलंकेविरुद्धच्या तीन सामन्यांच्या आगामी एकदिवसीय मालिकेसाठी बांगलादेश क्रिकेट बोर्डाने सोमवारी १६ खेळाडूंचा संघ जाहीर केला असून, त्यामध्ये लिटन दास, तस्किन अहमद आणि मुस्तफिजुर रहमान यांसारख्या वरिष्ठ खेळाडूंनी पुनरागमन केले आहे. ही मालिका २ जुलैपासून कोलंबो येथे सुरू होणार आहे.

टी-२० कर्णधार लिटन दास, ज्याला नुकत्याच झालेल्या चॅम्पियन्स ट्रॉफीच्या तयारीदरम्यान फारसा संधी मिळालेला नव्हता, त्याला या मालिकेच्या माध्यमातून पुनरुज्जीवनाची संधी देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे वेगवान गोलंदाज तस्किन अहमद आणि मुस्तफिजुर रहमान यांनी दुखापतीतून सावरल्यानंतर पुन्हा संघात पुनरागमन केले आहे.

मुख्य निवडकर्ता गाजी अशरफ हुसेन म्हणाले की , लिटन सध्या कठीण टप्प्यातून जात आहे. परंतु त्याच्यात गुणवत्ता आहे आणि आम्हाला विश्वास आहे की एकदिवसीय सामन्यांतून तो पुन्हा फॉर्ममध्ये येईल व टी-२० संघालाही बळकटी देईल.

संघात पाच वेगवान गोलंदाजांचा समावेश करण्यात आलेला असून, वर्कलोड मॅनेजमेंट लक्षात घेऊन ही रचना केली गेल्याचे अशरफ यांनी स्पष्ट केले. मुस्तफिजुर व तस्किन यांच्यासोबतच नाहिद राणासाठीही कार्यभार संतुलित ठेवण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे आम्ही पुरेसे पर्याय ठेवल्याचे पाहिले आहे, असे त्यांनी नमूद केले.

यापूर्वी पार पडलेल्या एकमेव कसोटी सामन्यात बांगलादेशचा कर्णधार नजमुल हुसेन शांतोने दोन्ही डावांत शतके ठोकत सामन्याला अनिर्णित राखले होते.



### एकदिवसीय मालिकेचा कार्यक्रम

**पहिला सामना – २ जुलै, कोलंबो**
**दुसरा सामना– ५ जुलै, कोलंबो**
**तिसरा सामना – ८ जुलै, पल्लेकेले**

### बांगलादेशचा एकदिवसीय संघ:

**मेहदी हसन मिराज (कर्णधार), तन्झिद हसन, परवेझ हुसेन इमोन, मोहम्मद नईम, नजमुल हुसेन शांतो, तौहिद हृदयॉय, लिटन दास, जाकर अली, शमीम हुसेन, रिशाद हुसेन, तन्वीर इस्लाम, मुस्तफिजुर रहमान, तन्झिम हसन, तस्किन अहमद, नाहिद राणा, हसन महमूद.**

# भारत-विरुद्ध ब्रूक: मैदानावरील वाद कायम

**नवी दिल्ली, दि. २३ :**

इंग्लंडचा आक्रमक फलंदाज हॅरी ब्रूक आणि भारतीय क्रिकेट संघ यांच्यातील नातेसंबंध हे अलिकडे केवळ क्रिकेटपुरते मर्यादित राहिलेले नाही. मैदानातील संघर्ष, आयपीएलमधील वादग्रस्त निर्णय आणि वक्तव्यांमधील टोकदारपणा ही या नात्याची वैशिष्ट्ये ठरली आहेत. रविवारी भारताविरुद्ध झालेल्या कसोटी सामन्यात मोहम्मद सिराजसोबतचा त्याचा वाद, तसेच ९९ धावांवर बाद झाल्यानंतर भारतीय खेळाडूंनी केलेला जल्लोष या पार्श्वभूमीवर हा संघर्ष पुन्हा चर्चेत आला आहे .

लीड्स येथे भारताविरुद्धच्या कसोटीत, इंग्लंडचा फलंदाज हॅरी ब्रूक आणि भारताचा वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराज यांच्यात मैदानावर तणाव निर्माण झाला. ब्रूकने दोन सलग चौकार लगावत उत्तर दिले, परंतु क्षणभराने हा वाद निवळला. नंतर, प्रसिद्ध कृष्णाच्या गोलंदाजीवर शार्दुल ठाकूरने ब्रूकचा झेल घेतला आणि तो ९९ धावांवर बाद झाला.



भारताच्या खेळाडूंनी ही विकेट विशेष जल्लोषात साजरी केली, ज्यात ब्रूकविरोधातील भावना स्पष्टपणे जाणवत होती.

ब्रूकचा आयपीएलबाबतचा इतिहासही तितकाच गाजलेला आहे. २०२४ च्या मेगा लिलावात दिल्ली कॅपिटल्सने त्याला ₹६.२५ कोटींना विकत घेतले होते. मात्र, त्यानंतर त्याने आयपीएलमधून माघार घेत राष्ट्रीय संघावर लक्ष केंद्रित करण्याचा निर्णय घेतला. त्याने एका निवेदनात म्हटले होते की , मी लहानपणापासून देशासाठी खेळण्याचे स्वप्न पाहिले आहे. मला जे योग्य वाटते तेच मी करणार. मात्र, आयपीएल च्या नव्या नियमांनुसार, अशा प्रकारे लिलावात सहभागी झाल्यानंतर खेळ न करण्याचा निर्णय घेणाऱ्या खेळाडूंना दोन हंगामांसाठी बंदी घालण्याची तरतूद आहे. त्यामुळे ब्रूकसाठी आयपीएलचे दरवाजे किमान २०२६ पर्यंत बंद राहण्याची शक्यता आहे.

२०२३ च्या आयपीएल हंगामात कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध शतक झळकावल्यानंतर ब्रूकने भारतीय चाहत्यांवर टीका करताना म्हटले होते , माझ्यावर टीका करणाऱ्यांना गप्प करण्याचा आनंद झाला.ब्रूकच्या पहिल्या काही अपयशी डावांमुळे सोशल मीडियावर त्याच्यावर मोठ्या प्रमाणावर टीका झाली होती, त्याला उत्तर देताना त्याची ही प्रतिक्रिया अनेकांना उद्दाम वाटली.

२०२५ च्या टी२० मालिकेदरम्यान ईडन गार्डन्समध्ये चक्रवर्तीच्या चेंडूवर बाद झाल्यानंतर ब्रूकने कोलकात्यातील धुक्याला दोष दिला. त्यानंतर चेन्नईतील दुसऱ्या सामन्यात पुन्हा एकदा चक्रवर्तीने त्याला झेलबाद केले. त्या वेळी समालोचन केंद्रात उपस्थित असलेल्या रवी शास्त्री आणि सुनील गावस्कर यांनी ब्रूकच्या धुक्या'च्या कारणावर उपरोधिक प्रतिक्रिया दिली.

# क्लब वर्ल्ड कपमध्ये युव्हेंटसची वायदादवर ४-१ अशी मात

**ऑर्लंडो, दि. २३ :**

तुर्कीचा युवा आघाडीपटू केनन यिल्डिजच्या दुहेरी कामगिरीच्या जोरावर युव्हेंटसने रविवारी क्लब वर्ल्ड कपमध्ये मोरोक्कोच्या वायदाद कॅसाब्लांकावर ४-१ अशी मात करत अंतिम १६ फेरीत प्रवेश मिळवला. यिल्डिजने दोन गोल नोंदवले आणि एक आत्मघाती गोल घडवण्यामागेही त्याचा हात होता.

६व्या मिनिटाला खेफ्रेन थुरामच्या पासवर यिल्डिजने झडप घातली. त्याचा शक्तिशाली शॉट वायदादच्या बचावपटू अब्देलमोनैम बाउटोइलकडून वळून जाऊन आत्मघाती गोल ठरला. अधिकृतपणे हा गोल बाउटोइलच्या नावे नोंदवण्यात आला, पण त्यामागची चाल यिल्डिजची होती.

१६व्या मिनिटाला यिल्डिजने पुन्हा एकदा आपली उपस्थिती लावली. आंद्रिया कॅम्बियासोने डाव्या फळीतून धाव घेत चेंडू यिल्डिजपर्यंत पोहोचवला, ज्याने तो थेट वरच्या कोपऱ्यात ठेवत दुसरा गोल नोंदवला.

ब्रेकपूर्वी दक्षिण आफ्रिकेच्या थेम्बिन्कोसी लॉर्चने वायदादसाठी एकमेव गोल करत सामन्यात थोडीशी रंगत आणली. मात्र दुसऱ्या सत्रात



युव्हेंटसने पुन्हा वर्चस्व गाजवत सामना पूर्णपणे आपल्या बाजूने वळवला.

६९व्या मिनिटाला फ्रेंच आघाडीपटू रँडल कोलो मुआनीच्या डावीकडील क्रॉसवर यिल्डिजने डिफेन्सला चकवा देत अत्यंत अचूक गोल करत आपला दुसरा आणि संघाचा तिसरा गोल साकारला. हा यिल्डिजचा स्पर्धेतील तिसरा आणि यंदाच्या मोसमातील १२ वा गोल होता.

इंज्युरी टाइममध्ये यिल्डिजची जागा घेतलेल्या दुसान व्लाहोविकने पेनल्टीवर गोल करत विजयावर शिक्कामोर्तब केले. ही पेनल्टी गिलहेर्म फेरेराच्या फाऊलनंतर देण्यात आली होती.

या विजयामुळे युव्हेंटसने गट 'जी' मध्ये दोन सामन्यांत सहा गुण मिळवत अव्वल स्थान मिळवले आहे. त्यांनी पहिल्या सामन्यात युएईच्या अल ऐन संघाचा ५-० असा धुव्वा उडवला होता. दोन्ही सामन्यांत मिळून त्यांनी ९ गोल केले आहेत.दुसरीकडे, वायदादने आपल्या पहिल्या सामन्यात मँचेस्टर सिटीकडून ०-२ असा पराभव पत्करला होता. त्यामुळे दोन पराभवांनंतर त्यांचे स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले आहे.

युव्हेचा पुढील सामना गुरुवारी मँचेस्टर सिटीविरुद्ध ऑर्लँडोमध्ये होणार आहे. त्या सामन्यात विजय मिळवल्यास किंवा अनिर्णित राखल्यास युव्हे गटात पहिल्या क्रमांकावरून बाद फेरी गाठू शकतो.२० वर्षीय जर्मन वंशाचा तुर्की खेळाडू केनन यिल्डिज सध्या युव्हेच्या आक्रमणाची धुरा लीलया सांभाळतो आहे. अल ऐनविरुद्ध त्याने केलेल्या गोलनंतर, वायदादविरुद्ध त्याने ३१,९७५ प्रेक्षकांच्या उपस्थितीत मॅन ऑफ द मॅच' अशी कामगिरी बजावली.

# बूमराह ठरला कसोटीत पाच बळींचा दहावा टप्पा गाठणारा पहिला भारतीय गोलंदाज

**लीड्स, दि. २३ :**

भारतीय वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने रविवारी लीड्स कसोटीत आणखी एक ऐतिहासिक कामगिरी करताना आपल्या नावावर खास विक्रम नोंदवला. इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या कसोटीच्या पहिल्या डावात बुमराहने २४.४ षटकांत केवळ ८३ धावा देत ५ बळी टिपले. त्याचा इकॉनॉमी रेट ३.३६ इतका राहिला.

'सेना' देशांमध्ये (साऊथ आफ्रिका , इंग्लंड , न्यूझीलंड , ऑस्ट्रेलीया ) कसोटी क्रिकेटमध्ये पाच बळींची कामगिरी दहाव्यांदा नोंदवणारा तो पहिला भारतीय गोलंदाज ठरला आहे. या यशामुळे बुमराहने क्रिकेट इतिहासात आपले स्थान अधिक भक्कम केले आहे. आणखी दोनवेळा पाच बळी टिपल्यास तो पाकिस्तानचा महान गोलंदाज वसीम अक्रम (११ वेळा) यालाही मागे टाकेल. परदेशात बुमराहने आतापर्यंत १२ वेळा पाच बळींची कामगिरी केली असून यामुळे तो भारताचे माजी कर्णधार कपिल देव यांच्या कामगिरीशी बरोबरी करू शकतो.



दरम्यान, कसोटी संघाचे कर्णधारपद न स्वीकारण्याच्या निर्णयावर बुमराहने प्रतिक्रिया देताना स्पष्ट केले की, त्याला स्वतःच्या शरीराची काळजी घ्यायची असून तो संघासाठी एक खेळाडू म्हणून सातत्याने योगदान देण्यास उत्सुक आहे.

कर्णधारपद काही फार मोठे नव्हते. मला माझ्या शरीराची काळजी घ्यायची आहे. माझ्यावर शस्त्रक्रिया करणाऱ्यांशी आणि माझ्या पुनर्वसन प्रक्रियेशी संबंधित लोकांशी चर्चा करून मी हा निर्णय घेतला. मी संघाला निराश करणे टाळू इच्छितो. कर्णधार म्हणून प्रत्येक सामन्यात उपस्थित राहावे लागते आणि जर मी पूर्ण वेळ खेळू शकलो नाही, तर ते संघासाठी योग्य ठरणार नाही. सातत्य हवेच. मी सध्या जेव्हा मैदानात आहे, तेव्हा खेळाडू म्हणून सर्वोत्तम योगदान देण्यास तयार आहे. भारतीय संघासाठी सामने जिंकणे हीच माझी सर्वोच्च प्राधान्य आहे, असे बुमराहने स्पष्ट केले.

खेळपट्टीच्या स्थितीबद्दल बोलताना बुमराह म्हणाला की, सध्या पिच फलंदाजीसाठी अनुकूल आहे आणि मोठ्या विचलनाचा अनुभव आलेला नाही.खेळपट्टी चांगली आहे, कोणतेही विशेष 'राक्षस' दिसले नाहीत. दोन-वेगाची थोडी झलक दिसतेय. थोडेफार स्विंग आहे, पण कसोटी क्रिकेटमध्ये ते अपेक्षितच असते. सध्या तरी फारसा विचलन नाही. आमचे लक्ष्य मोठी धावसंख्या उभारण्याचे आहे, आणि इंग्लंडला ती उशी देण्याचे आहे, असे तो म्हणाला.

इंग्लंडच्या हॅरी ब्रुकने पहिल्या डावात ९९ धावा करत प्रभावी खेळी साकारली. त्याबद्दल बुमराहने विशेष कौतुक करताना तो एक मनोरंजक आणि अडचणीत टाकणारा फलंदाज असल्याचे म्हटले.नशिबाने त्याच्यासाठी ९९ धावांवर टप्पा थांबला. त्याने परिस्थितीचे उत्तम मूल्यांकन केले आणि त्याचा खेळ खरोखर प्रभावशाली होता. तो आक्रमक खेळतो आणि चांगल्या स्पेलमध्येही गोलंदाजाला दबावात आणू शकतो. पुढच्या डावात त्याला रोखण्याचा आम्ही अधिक चांगला प्रयत्न करू, असेही बुमराह म्हणाला.

# बुमराहच्या नावावर ९ विकेट्स झाले असते – सचिन

**लीड्स, दि. २३ :**

भारतीय वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहच्या कसोटीतील पाच बळींच्या अप्रतिम कामगिरीनंतर भारतीय क्रिकेटचे दिग्गज सचिन तेंडुलकरने त्याचे अभिनंदन करताना क्षेत्ररक्षणातील चुका आणि नो-बॉलमुळे त्याला मिळू शकलेल्या '९ विकेट्स' हुकल्यावर स्पष्टपणे भाष्य केले.

इंग्लंडविरुद्धच्या लीड्स कसोटीच्या पहिल्या डावात बुमराहने २४.४ षटकांत ८३ धावा देत ५ बळी घेतले. त्याचा इकॉनॉमी रेट ३.३६ राहिला. मात्र, त्याला मिळू शकलेल्या आणखी बळी तीन झेलांच्या चुकवलेल्या संधी आणि एका नो-बॉलमुळे हुकल्या.

तेंडुलकरने सोशल मीडियावर एक्स ' (पूर्वीचे ट्विटर) वर पोस्ट करत लिहिले, अभिनंदन बुमराह! तुझी कामगिरी अव्वल होती. तुझ्या नावावर अजून तीन झेल आणि एक नो-बॉलने हुकलेला एक मिळून नउ विकेट असल्या असत्या.

बुमराहने दुसऱ्या सत्रापर्यंत इंग्लंडचा डाव ४६५ धावांवर गुंडाळत भारतासाठी सहा धावांची आघाडी मिळवून दिली. विशेष म्हणजे, बुमराहने फलंदाज हॅरी ब्रूकला शून्यावर बाद केले होते, परंतु तो चेंडू नो-बॉल ठरला . याशिवाय यशस्वी जयस्वालने त्याच्या गोलंदाजीवर बेन डकेट, ऑली पोप आणि ब्रूकचे झेल सोडले.

या कामगिरीमुळे बुमराहने सेना देशांतील (दक्षिण आफ्रिका, इंग्लंड, न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलिया) कसोट्यांत १० व्या वेळी पाच बळींची नोंद केली आहे. हा विक्रम गाठणारा तो पहिलाच भारतीय ठरला आहे. पुढील दोन सामन्यांत अशीच कामगिरी केल्यास, तो पाकिस्तानच्या वसीम अक्रमला (११ वेळा) मागे टाकेल.

त्याचबरोबर बुमराहचा हा परदेशातील १२ वा फाइव्ह-फॉर' असून त्यामुळे तो माजी कर्णधार कपिल देव यांच्या विक्रमाशी बरोबरी करतो. विशेष म्हणजे, बुमराहने केवळ ३४ कसोटी सामन्यांत हे यश संपादन केले आहे, तर कपिल यांनी हे यश ६६ सामन्यांत मिळवले होते.

देशनिहाय त्याची पाच बळींची कामगिरी पाहता त्याने ऑस्ट्रेलियात ४ वेळा,इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिका यांच्याविरोधात प्रत्येकी ३ वेळा,वेस्ट इंडिज विरोधात २ वेळा आणि भारतात २ वेळा कसोटी सामन्यात ५बळी घेतले आहेत

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २९२ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 292 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .